आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

११ मे २०२४ - शनिवार

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार आज संध्याकाळी संपेल त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांच्या प्रचाराने आता जोर धरला आहे. या टप्प्यात राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, सोमवारी १३ मे रोजी मतदान होणार आहे. या अकरा मतदार मतदारसंघांत एकूण २९८ उमेदवार निवडणूक लढवत असून, एकूण २३ हजार २८४ मतदान केंद्र आहेत. सर्वाधिक ४१ उमेदवार बीडमध्ये तर सर्वात कमी ११ नंदुरबारमध्ये आहेत. या टप्प्यात २ कोटी २८ लाखांहून अधिक मतदारांची नोंद झाली असून सर्वाधिक २५ लाख ८५ हजार मावळमध्ये तर सर्वात कमी १६ लाख ७७ हजार शिर्डीमध्ये आहेत.

या टप्प्यात रिंगणात असलेल्या महत्त्वाच्या उमेदवारांमध्ये केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, राज्य सरकारमधले मंत्री संदीपान भुमरे, पंकजा मुंडे, चंद्रकांत खैरे, मुरलीधर मोहोळ, रविंद्र धंगेकर, वसंत मोरे यांच्यासह विद्यमान खासदार हीना गावित, रक्षा खडसे, इम्तियाज जलील, अमोल कोल्हे, श्रीरंग बारणे, सुजय विखे-पाटील, सदाशिव लोखंडे यांच्यासारखे अनेक उमेदवार रिंगणात आहेत.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी केवळ मतांसाठी आश्वासन देत असल्याचा आरोप काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आज नंदुरबारमधल्या सभेत केला. राजकीय फायद्यासाठी नरेंद्र मोदी छान छान गोष्टी सांगतात. मात्र सर्वसामान्यांशी असलेला त्यांचा संपर्क तुटल्याचा दावा प्रियंका यांनी या भाषणात केला. देशभरात विविध ठिकाणी आदिवासींवर झालेल्या अत्याचारांना विद्यमान सरकार जबाबदार आहे. देशभरातल्या २२ लाख आणि राज्यातल्या २ लाख आदिवासींना या सरकारनं पट्टे दिले नाही, असंही त्या म्हणाल्या. या देशात शेतकरी, कष्टकरी नव्हे तर मोठ्या

उद्योगपतींची कर्ज माफ होत असल्याचा आरोप त्यांनी केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याबद्दल आम्हाला आदर आहे. त्यांना नव्या संसदेच्या उद्घाटनाला आमंत्रितही केलं नाही, यावरुन प्रधानमंत्री कशारितीने त्यांचा अनादर करतात ते दिसून येतं, असं त्यांनी सांगितलं. **राज्यातल्या** महाविकास आघाडी सरकार पाडल्याबद्दलही त्यांनी प्रधानमंत्री यांच्यावर टीका केली. राज्यातल्या आमदारांवर दबाव आणून, खटले भरुन, भ्रष्टाचार करुन सत्ता मिळवल्याचा आरोप प्रियंका गांधी यांनी केला.

**<><><><><><>**

नाशिकमधे पर्यावरण प्रेमींनी अनोखा पर्यावरण जाहिरनामा तयार केला आहे. मतदान करा फुल, नाशिक करा कुल असे त्याचे ब्रिद वाक्य आहे. नदीच्या संवर्धनासाठी पूररेषेत कोणतीही बांधकामे होऊ देऊ नयेत, डोंगरांवर वृक्षारोपण करावे, प्रादेशिक गौवंश जगवून प्रदूषण मुक्त, विषमुक्त शाश्वत ग्रामविकासासाठी प्रयत्न करावेत, शिवकालीन गड किल्ले आणि डोंगर यांचे संवर्धन करावेत अशा प्रकारच्या मागण्या या जाहिरनाम्यात आहेत.

**<><><><><><>**

भारताला आघाडीची जागतिक अर्थव्यवस्था बनवण्यात आपण काय योगदान देऊ शकतो, हा विचार करून तरुणांनी मार्गक्रमण करावं, असं मत परसिस्टंट सिस्टम चे संचालक आनंद देशपांडे यांनी व्यक्त केलं. ते आज नागपूरच्या मिहान इथल्या भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या आठव्या दीक्षांत सोहळ्यात बोलत होते. यावेळी २९० विद्यार्थ्यांना एमबीए आणि एक्झिक्युटिव्ह एमबीए पदवी प्रदान करण्यात आली.

**<><><><><><>**

पुण्यातल्या एनडीए परिसरात काल संध्याकाळी बॉम्ब आढळला होता, असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. बॉम्ब शोधक आणि नाशक पथकानं हा बॉम्ब आज निकामी केला.

<><><><><><>

पंढरपूर इथल्या गुरुजींबुवा राशींनकर फडाचे मालक हरि भक्त परायण आप्पासाहेब महाराज राशींनकर यांचं काल निधन झालं. ते ७८ वर्षांचे होते. राज्यासह कर्नाटक, आंध्रप्रदेशमध्ये त्यांचा फार मोठा शिष्य परिवार आहे.

<><><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकता नाईट रायडर्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना होणार आहे. कोलकत्यातल्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर संध्याकाळी सात वाजता हा सामना खेळला जाईल.

<><><><><><>

कोल्हापूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी काल वीजांच्या कडकडाटासह पाऊस झाला. पारगाव, शिये, टोप संभापूर, कागल भागात ही जोरदार पाऊस झाला. कागलमध्ये वीटभट्टी जवळ वीज कोसळून ६ जण जखमी झाले.

<><><><><><>

कोकणांत काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा आणि हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. नाशिक, अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटांसह, वादळ आणि सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता असून हवामान विभागानं या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. विदर्भात अमरावती, अकोला, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ

आणि उस्मानाबाद, लातूर, नांदेड, बीड, औरंगाबाद , सोलापुर, सांगली या जिल्ह्यांना विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता असून या जिल्ह्यांना येलो अलर्ट दिला आहे.

//<><><><><><>//